**नवी मुंबई महानगरपालिका**

Navi Mumbai Municipal Corporation

भूखंड क्रमांक -०१, सेक्टर -१५अे, सीबीडी,
बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४
दूरध्वनी क्र :०२२ - २७५६ ७०९५

PLOT NO.-01, SECTOR – 15A, CBD,
BELAPUR NAVI MUMBAI – 400 614
TEL. No. : 022-2756 7095

## -: जाहिर आवाहन :-

केंद्र शासनाने पदपथावरील विक्रेते (उपजिविका संरक्षण व पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४ पारीत केलेला असून राज्य शासनामार्फत अधिनियमातील कलम-३६(१) मधील तरतुदीनुसार नियम तयार करणे तसेच कलम ३८(१) नुसार स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शहर फेरीवाला समितीशी सल्लामसलत करुन फेरीवाल्यांसाठी योजना तयार करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

याव्दारे महापालिका क्षेत्रातील नागरिक/फेरीवाला व्यावसायिकांना जाहिर आवाहन करण्यात येत आहे की, महापालिकेकडून फेरीवाला नोंदणी अर्ज, फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र, फेरीवाला ओळखपत्र, फेरीवाला व्यवसायासाठी जागा देतो असे आमिष दाखवून काही अज्ञात व्यक्तींकडून, नागरिक / फेरीवाल्यांची फसवणूक होण्याची शक्यता आहे.

महापालिकेकडून फेरीवाला नोंदणी अर्ज, फेरीवाला सर्वेक्षण, फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र, फेरीवाला ओळखपत्र व फेरीवाला व्यवसायासाठी जागा देणे यापैकी सद्य:स्थितीत कोणतीही कार्यवाही सुरु नाही. ज्यावेळी अशाप्रकारचे काम महापालिकेमार्फत सुरु करण्यात येईल त्यावेळी वृत्तपत्राव्दारे, महापालिका संकेतस्थळावर, महापालिका सूचना फलकावर याबाबतची जाहिर सूचना प्रसिध्द करुन अत्यंत पारदर्शीपणे कार्यवाही केली जाणार आहे.

तरी याव्दारे सर्व नागरिक/फेरीवाला व्यावसायिकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, कोणत्याही अज्ञात व्यक्ती/ठग यांच्या वरील प्रकारच्या भूलथापांना बळी पडू नये. अन्यथा यापासून आपल्या होणा-या वित्तीय हानीस सर्वस्वी आपणच जबाबदार असाल. याबाबत महापालिका जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- बेलापूर
दिनांक :- १७/११/२०१४

**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**